स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade
NAAC Re-accredited
(4th Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक:२० जानेवारी २०२३

जळगाव दि.२० (प्रतिनिधी) कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अधिसभेवर नोंदणीकृत पदवीधर गटामधून निवडून द्यावयाच्या १० सदस्यांसाठी २१ उमेदवारांनी अर्ज माघारी घेतल्यामुळे २७ उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात राहिले आहेत.

११ व १२ जानेवारी या दोन दिवसात ७७ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. छाननी नंतर १२ अर्ज अवैध ठरल्यामुळे ६५ अर्ज वैध ठरले होते. १९ जानेवारी ही उमेदवारी अर्ज मागे घेण्याची तारीख होती. ६५ वैध अर्जांपैकी २१ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले. काही उमेदवारांनी एका पेक्षा अधिक अर्ज भरले होते. त्यांचा एक अर्ज ग्राहय धरल्यामुळे आता निवडणूकीच्या रिंगणात २१ उमेदवार कायम राहिले आहेत.

खुल्या संवर्गात १३ अर्ज माघारी घेतल्यामुळे ५ जागांसाठी ११ उमेदवार रिंगणात आहेत. इतर मागास संवर्गात ३ जणांनी माघार घेतल्यामुळे एका जागेसाठी ३ उमेदवार निवडणूक लढवतील. अनुसूचित जाती संवर्गात २ जणांनी माघार घेतल्यामुळे एका जागेसाठी ४ उमेदवार कायम राहिले आहेत. तर अनु जमाती संवर्गात एकाने माघार घेतल्यामुळे एका जागेसाठी दोघांमध्ये सरळ लढत होईल. विमुक्त जाती / भटक्या जमाती संवर्गात एका उमेदवाराने माघार घेतल्यामुळे एका जागेसाठी ३ उमेदवार रिंगणात आहेत. तर महिला संवर्गात एकाने माघार घेतल्यामुळे एका जागेसाठी ४ उमेदवार निवडणूक लढवीत आहेत. अशा एकूण १० जागांसाठी २७ उमेदवार निवडणूक लढवणार असून २९ जानेवारी २०२३ रोजी जळगाव जिल्हयातील १७, धुळे जिल्हयातील ५ व नंदुरबार जिल्हयातील ५ अशा एकूण २७ मतदान केंद्रावरील ६० बुथवर मतदान होणार आहे अशी माहिती कुलसचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ.विनोद पाटील यांनी दिली.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी